४/1/2022

# ॥ पेढा द्या पेढा ॥

पेढ्याचे वाटप लग्न समारंभ, बारसे इत्यादी मंगल प्रसंगी आलेल्यांना समारंभात भाग घेणाऱ्या वधू आणि वर पक्षात एकी झाली दर्शवणारे द्योतक आहे. तिथे श्रीमंत, गरीब भेद नसतो. भोजना आधीच लग्नाच्या हॉलच्या दारावर दोन किंवा तीन माणसे आलेल्यांच्या स्वागतासाठी उभे असतात.

वातावरणात बदल घडविण्यासाठी विशेषकरून सर्व स्त्रीवर्ग एकापेक्षा एक उंची आणि भरजरी साड्या अथवा बदल काळानुसार पंजाबी ड्रेस व लहान वयोतील मुले मुली मीनी साडी (कळना साडी) घोळर कुर्ता नेसून येतात. अशाप्रसंगी सर्वांना सगळं व्यवस्थित मिळतंय कि नाही व कोणी विन्मुख जाऊ नये म्हणून एक व्यक्ति असते तिला नारायण म्हणतात. त्यांच्यावर ही जबाबदारी असते. समारंभात कधी न भेटणारी माणसे एकमेकांना भेटी घेतल्यावर तर हॉल किंवा समारंभात तुमचा मुलगा काय करतो आहे? व माझी मुलगी किती शिकली, स्थळ बघण्याच सुचवून समस्यांवर सतत स्वतःची छाप पाडत असतात. गोंगाट सुरु असतो. त्यातच सर्वांना उन्हाळा पावसाळा असेलतर आंब्याचे पन्हे, रंगीबेरंगी सरबते ही एक किंवा दोन मुलेही उठे काका, मामा, ताई, दादा अशी विशेषणे लावुन आणखी दोनच घ्या, आई-बाबांना घ्या वगैरे लगाद्या लावुन वसुली करतात.

पेढे वाटपानंतर सुग्रास भोजनासाठी खमंगदार भोजनासाठी किती प्रकार सर्वांसाठी करावे लागतील व साधारण ते पुरवतांना प्रथम कोणता पदार्थ वाढायचा हे सेटिंग ठरवत असतो. खारट, तुरट, आंबट आवडीचा पदार्थ एक पक्क भाजी, काजूचे तुकडे घालुन ते वाढुन पंक्तीत सुरु करतो. नेहमीचे वरण भाजी, भाजी हे असतेच. आलेल्यांचे स्वागत करून सर्वांना पंक्ति सुरु करण्याचा आग्रह करत. किती पैकी व अजून माणसे यायचा विचार करत वधू-वर माता-पिता फिरत असतात. हल्ली तर पदार्थ लांब टेबलावर ठेवुन प्रत्येकाला व्यवस्थित घ्यायला लावतात. मंडपात पेढ्यांचे सुटलेले पेपर हा नारायण गोळा करत असतो. पेढे, पान-सुपारी मिळाल्यावर हळू-हळू पांगलेली मंडळी मंडपातुन जातात. हे सगळं नारायण दुरून बघत असतो.

बिच्चारे पेढे! सर्वांच्या नशिबी हे नसत कारण काहीवेळा श्राद्धात चवदार म्हणून प्रकार आहे ते चालविणारे ब्राह्मण दूध-केळी किंवा साखर घातलेले दूध हे टाळुन फक्त पेढ्यांवर भागवतात. पण बिच्चारा पेढा त्याच्या नशिबी श्राद्धाचा भाग येतो.

बिच्चारा पेढा!

सौ. अनघा आपटे
mb- 9146398897
सौ. अनघा आपटे